• वर्ष : ०३ • अंक : ३३२ • पुणे • रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com




# महिलांनीच बंधनात का रहायचं?

**मनुस्मृतीतील विचार लाजिरवाणे** | **पितृसत्ताक व्यवस्थेला उखडून टाका !** | **राहुल गांधी यांचे आवाहन**

## स्त्री कोणाचीही मालकी वस्तू नाही : भारतातील महिला हीच देशाची सर्वात मोठी ताकद

*काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा ‘छात्रों की गुंज’ हा कार्यक्रम आज (२२ ऑगस्ट २०२६) पुण्यात पार पडला आहे. या कार्यक्रमासाठी काँग्रेसकडून मागील काही दिवसांपासून मोठी तयारी सुरू होती. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काँग्रेसचे दिग्गज नेते पुण्यात ठाण मांडून होते. राहुल गांधी यांचा ‘छात्रों की गुंज’ हा चौथा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी ‘जेन झी’शी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केलं आहे.*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिल्लीतील ‘जेन झी’च्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांचा हा कार्यक्रम महत्वाचा मानला जात होता. ‘छात्रों की गुंज’ या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रभरातून पुण्यात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी ‘जेन झी’शी संवाद साधत महत्वाचं भाष्य केलं आहे. ‘महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे’, असं म्हणत राहुल गांधी यांनी मनुस्मृतीवरून जोरदार टीका केली. “मी आज या ठिकाणी राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही. तरुणांची संख्या ही भारताची मोठी ताकद आहे. मला अनेकदा विचारलं जातं की भारताची ताकद काय आहे? हा प्रश्न विचारल्यावर अनेक उत्तरे मिळतात. कोणी म्हणतं की आपली अर्थव्यवस्था, कोणी म्हणतं की आपलं सैन्य, कोणी म्हणतं की आपली आरोग्य व्यवस्था, तर कोणी कदाचित आपली लोक संख्या असंही म्हणतं. पण भारताची सर्वात मोठी ताकद काय आहे, याबद्दल माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे. ७० कोटी भारतीय महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. महिला शक्ती हीच देशाची ताकद आहे”, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

“महिला या पुरुषांच्या तुलनेत स्वभावात अधिक संवेदनशील, सौम्य, दयाळू असतात. म्हणून माझा ठाम विश्वास आहे की, भारतातील महिला हीच देशाची सर्वात मोठी ताकद आहे. जेव्हा मी पुरुषांशी बोलतो, तेव्हा महिला प्रामुख्याने तीन चौकटींमध्ये पाहिलं जातं. मुलगी, पत्नी किंवा आई म्हणून पाहिलं जातं. आता, पत्नी, मुलगी किंवा आई म्हणून ओळखलं जाण्यात काही गैर नाही. परंतु ही महिलांची एकमेव ओळख असू शकत नाही”, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

“मनुस्मृतीने महिलांना तीन चौकटीत बसवलं. महिल स्वतंत्र नाही, असा मनुस्मृतीचा विचार आहे. महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनस्मृतीचा डाव आहे. मात्र, तुम्ही तुमच्या स्वत:च्या शिवाय दुसऱ्या कोणालाही बांधिल नाही”, अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.

अनेक विद्यार्थीनींनी व्यासपीठावर जाऊन राहुल गांधी यांच्याशी संवाद साधत आपल्या व्यथा मांडल्या आहेत. काही विद्यार्थीनींनी त्यांना आलेले काही धक्कादायक अनुभव देखील सांगितले आहेत. यावेळी राहुल गांधी यांनी एक आकडेवारी सांगत देशातील हिंसाचार, बलात्कार, विनयभंग अशा घटनांची धक्कादायक आकडेवारी सांगितली आहे.

मी तुम्हाला महत्त्वाचा मुद्दा सांगतो आहे. मी या ठिकाणी तुम्हाला जी पहिली स्लाईड दाखवली त्यात महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार, त्यांचं लैंगिक शोषण हे मुद्दे मांडले. आता आपण दुसऱ्या मुद्द्यावर बोलू. ९९ टक्के मुली, महिला बलात्कार, लैंगिक शोषण याच्या तक्रारी दाखलच करत नाहीत. ८४ टक्के महिलांना काम करायचं असेल तर संमती घ्यावी लागते. तसंच ज्या महिला नोकरी करत आहेत त्यांना पुरुषांच्या तुलनेत २५ टक्के कमी पगार दिला जातो. हा महिलांचा अनादरच आहे दुसरं काय? असा सवाल राहुल गांधींनी विचारला.




पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांची विचार करण्याची पद्धत ही पुरुषी मानसिकता असलेली आहे. जंतर-मंतर या ठिकाणी जेव्हा आंदोलन सुरु होतं तेव्हा मुलींनी शिव्या देणं हा त्यांच्यासाठी सांस्कृतिक धक्का होता. या विषयीचा व्हिडीओ दाखवत राहुल गांधी म्हणाले की जंतर-मंतर या ठिकाणी मुलांनाही पंतप्रधान नरेंद्र मोदींना आणि सरकारला शिव्या दिल्या. पण पंतप्रधान नरेंद्र मोदींना सांस्कृतिक धक्का फक्त मुलींनी शिव्या दिल्यामुळे बसला. मुलांनी शिव्या दिल्या त्याचं त्यांना काही वाटलं नाही. जंतर-मंतर या ठिकाणी तरुण पिढीने राग व्यक्त केला. त्यांची जी भाषा आहे त्या भाषेत ते व्यक्त झाले. त्यात गैर काय? पण या सगळ्यातून सरकारचा मनुवादी दृष्टीकोन दिसून आला. असं म्हणत राहुल गांधींनी त्यांच्या भाषणात मोदी सरकार आणि संघावर जोरदार टीका केली. मुलींनी शिव्या देणं शोभत नाही असं सांगितलं जातं. मोहन भागवत म्हणतात इंडिया में रेप होता है, भारत मे रेप नहीं होता. खट्टर म्हणतात ८० टक्के बलात्कार महिलांमुळे येतात. ही एक घाणेरडी मानसिकता आहे. या मानसिकतेशीच आपला लढा आहे. ही मानसिकता अशी आहे की मुलींची एक जागा आहे, तिला पिंजऱ्यात कोंडलेलंच असलं पाहिजे. तिच्यावर पुरुषांचं नियंत्रण हवं. तर मुलांना पूर्ण स्वातंत्र्य मिळालं पाहिजे. त्यांना काम करु द्या, शिव्या देऊ द्या काहीही करु द्या. असा हिंदुस्थान आपल्याला नको आहे. आम्हाला आदर हवा आहे आणि तो सगळ्यांसाठी हवा आहे असंही राहुल गांधी म्हणाले.

“महिला या पुरुषांच्या तुलनेत स्वभावात अधिक संवेदनशील, सौम्य, दयाळू असतात. म्हणून माझा ठाम विश्वास आहे की, भारतातील महिला हीच देशाची सर्वात मोठी ताकद आहे. जेव्हा मी पुरुषांशी बोलतो, तेव्हा महिला प्रामुख्याने तीन चौकटींमध्ये पाहिलं जातं. मुलगी, पत्नी किंवा आई म्हणून पाहिलं जातं. आता, पत्नी, मुलगी किंवा आई म्हणून ओळखलं जाण्यात काही गैर नाही. परंतु ही महिलांची एकमेव ओळख असू शकत नाही”, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

### शर्ट-शूजची चर्चा; ब्रँड कोणता, किंमत किती?

काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा पुण्यातील ‘छात्रों की गूंज’ कार्यक्रम शनिवारी (२२ ऑगस्ट) पार पडला. या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी केलेल्या भाषणासोबतच त्यांच्या ड्रेसिंगचीही सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. राहुल गांधी यांनी परिधान केलेला शर्ट, शूज आणि त्यांची साधी राहणी याकडे अनेकांचे लक्ष वेधले आहे. राहुल गांधी यांनी घातलेला शर्ट नेमका कोणत्या कंपनीचा आहे, याबाबत सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये राहुल गांधी यांचा शर्ट ‘GANT’ या ब्रँडचा असल्याचा दावा करण्यात आला आहे. यापूर्वीही राहुल गांधी यांच्या शर्टच्या ब्रँड आणि किमतीबाबत सोशल मीडियावर चर्चा झाली होती. व्हायरल व्हिडिओतील माहितीनुसार, राहुल गांधी यांनी पुण्यातील कार्यक्रमात परिधान केलेल्या शर्टची किंमत अंदाजे ५ ते ६ हजार रुपयांच्या आसपास असल्याचे सांगितले जात आहे. राहुल गांधी यांच्या पायातील शूजचीही चर्चा होत आहे. त्यांनी परिधान केलेले शूज ‘PUMA’ कंपनीचे असल्याचा दावा या व्हिडिओमध्ये करण्यात आला आहे. या शूजची किंमत अंदाजे १० हजार रुपयांपर्यंत असल्याचे सांगण्यात आले आहे. राहुल गांधी वापरत असलेले संबंधित मॉडेल भारतात सहज उपलब्ध नसून ते युरोपमधून खरेदी केले जात असल्याचा दावाही व्हिडिओमध्ये करण्यात आला आहे. दरम्यान, राहुल गांधी यांच्या संपूर्ण ड्रेसिंगचा अंदाज घेतल्यास शर्टची किंमत ५ ते ६ हजार रुपये, तर शूजची किंमत सुमारे १० हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. पॅन्ट आणि इतर वस्तूंची किंमत धरूनही त्यांचा संपूर्ण लूक २५ हजार रुपयांच्या आसपास असल्याचा दावा या व्हिडिओमध्ये करण्यात आला आहे. राहुल गांधी यांच्या ड्रेसिंगबाबत सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. मात्र, व्हायरल व्हिडिओमध्ये सांगितलेल्या ब्रँड आणि किमतींची अधिकृतपणे पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या किमती आणि ब्रँडची माहिती दावे म्हणूनच पाहणे योग्य ठरणार आहे.

### मी पण सुधारणार नाही : राहुल गांधी

या कार्यक्रमात नेहा सिंग राठोड ही भोजपुरी गायिका आली होती. तिने सांगितलं मी सरकारला प्रश्न विचारते, त्यांना आवडत नाही असे प्रश्न विचारते त्यामुळे मागच्या पाच वर्षांपासून शिव्या दिल्या जात आहेत. हा महिलांचा आदर आहे का? असा सवाल जेव्हा नेहाने विचारला तेव्हा ती म्हणाली की मला सांगतात की तुला आम्ही पाच वर्षांपासून शिव्या देत आहोत तू सुधारली नाहीस का? मी त्यांना सांगू इच्छिते की मी सुधरणार नाही. त्यावर राहुल गांधी लगेच म्हणाले की माझंही असंच आहे. मलाही गेल्या अनेक वर्षांपासून हे लोक शिव्या देत आहेत पण मी देखील सुधारणार नाही. या राहुल गांधींच्या वाक्यानंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला.



## थोडक्यात पण महत्त्वाचे



## धर्मांतर कायद्यानुसार दाखल गुन्हा रद्द करण्याची रिपब्लिकन पार्टीची मागणी

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रात लागू होणाऱ्या नव्या धर्मांतरविरोधी कायद्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील खडकी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तांना निवेदन सादर केले. हे निवेदन पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहर सचिव महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहर उपाध्यक्ष इशु दोरोस्वामी , शहर सचिव स्टॅनली मेथन यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनानुसार, धर्मांतर विषयक नवीन कायदा २८ ऑगस्ट २०२६ पासून राज्यात लागू होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, या कायद्यांतर्गत खडकी पोलीस ठाण्यात १८ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे. नवीन कायदा लागू होण्यापूर्वीच त्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याने या प्रकरणाची पडताळणी करून संबंधित गुन्हा रद्द करावा, अन्यथा पुणे शहर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात येतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. पक्षाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.



## सुनीता डांगे यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : यशस्विनी विकास प्रतिष्ठानच्या संस्थापिका, नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या संस्थापिका सौ. सुनीता राजाराम डांगे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्तदान हे सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अनेक नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदविला. दरम्यान, सौ. सुनीता राजाराम डांगे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, सहकारी व हितचिंतकांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी दिपाली कुमावत, रश्मी सोरटे, रोहिणी पवार, अनुसया गायकवाड, दशरथ मनेरे, मनोज वाळुंजकर, विद्याचरण मनेरे, संजय पवार, राजाराम डांगे, साक्षी डांगे, प्रियंका चोटलिया यांच्यासह शिक्षक स्टाफ, पुणे ब्लड सेंटर हडपसर स्टाफ तसेच देवयानी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलच्या स्टाफची उपस्थिती होती. सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

"वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस न राहता, समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधी असावी. रक्तदानासारख्या उपक्रमातून एखाद्याचे जीवन वाचण्यास मदत होत असेल, तर त्यापेक्षा मोठे समाधान दुसरे नाही. भविष्यातही सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा प्रयत्न राहील."

*- सौ. सुनीता राजाराम डांगे, संस्थापिका, यशस्विनी विकास प्रतिष्ठान*




# महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनुस्मृतीचा डाव

## पुण्यातून राहुल गांधींचा थेट घाव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिला या देशाची सर्वात मोठी ताकद आहेत. त्यामुळे महिला या कधीच स्वतंत्र राहू नये हा मनुस्मृतीचा डाव असल्याचं विधान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुण्यात केलं. तुम्ही स्वत:शिवाय कोणालाही बांधील नाही. महिलांवर कोणत्याही पुरुषाचा अधिकार नाही. महिलांनी सगळ्याच क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मात्र तरीही त्यांना विशिष्ट चौकटीत बसवलं जात असल्याची खंत राहुल यांनी 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात व्यक्त केली. पिंजरा तोडा, हीच या कार्यक्रमाची संकल्पना आहे. मी इथे राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही. शिक्षण घेताना मुलींना अडचणींचा सामना करावा लागतो. तुम्ही सगळे जण खास आहात. भारतातल्या ७० कोटी महिला ही या देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचं राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हटलं. यावेळी अनेक विद्यार्थिनींनी राहुल गांधी यांच्याकडे त्यांचे अनुभव, त्यांच्या समस्या मांडल्या.

महिला या देशाची सर्वात मोठी ताकद आहे. त्यांनी कधीच स्वतंत्र राहू नये हा मनुस्मृतीचा डाव आहे. मनुस्मृतीत महिलांबद्दल चुकीची व्याख्या आहे. महिलांना स्वातंत्र्य नाही असा विचार त्यात मांडण्यात आला आहे. फक्त मुलगी, पत्नी, आई ही महिलांची ओळख नाही, असं राहुल गांधी तरुणाईशी संवाद साधताना म्हणाले.

देशातील ७० कोटी महिलाच विशेष वाटण्यामागचं, महत्त्वाच्या वाटण्यामागचा विचारदेखील राहुल गांधी यांनी स्पष्ट केला. 'देशात ७० कोटी पुरुषही आहेत. मग ७० कोटी महिलाच महत्त्वाच्या का वाटतात? यामागचा तर्क काय? असा प्रश्न पडू शकतो. त्याला माझं उत्तर आहे की महिला नैसर्गिकरित्या अधिक संवेदनशील असतात. त्यांना पुरुषांच्या तुलनेत अधिक सहानुभूती असते. त्यामुळे महिला वर्ग, मग त्या तरुणी असोत वा वृद्ध असोत, त्या भारताचं सामर्थ्य आहेत,' असं राहुल गांधी यांनी सांगितलं. जेन झीशी संवाद साधताना राहुल गांधींनी महिलांवरील अत्याचारांचे आकडेच वाचून दाखवले. देशातील महिलांची स्थिती गंभीर असल्याचं त्यांनी आकडेवारीतून सांगितलं. दरवर्षी साडे चार लाख मुलींची जन्माआधीच हत्या होते. ८० टक्के महिलांचा छळ होतो. ३० टक्के महिलांचा शारीरिक छळ होतो. १०० पैकी ६ महिलांवर भारतात अत्याचार होतो, अशी आकडेवारीच राहुल यांनी मांडली.

## दिशा परिवारतर्फे २५० विद्यार्थांना शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान सोहळा

- **दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या हस्ते पुण्यात रविवारी होणार वितरण**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गरजू व गुणवत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. यंदा कार्यक्रमाचे २० वे वर्ष असून, येत्या रविवारी (ता. २३ ऑगस्ट) सकाळी १० वाजता नवी पेठेतील एसएम जोशी सभागृहात हा सोहळा पार पडणार आहे, अशी माहिती संस्थेचे शिष्यवृत्ती प्रदान समारंभ समितीचे अध्यक्ष सुजीत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी निखिल पडवळ आणि चिन्मय कुलकर्णी उपस्थित होते. सुजीत शिंदे म्हणाले, "या कार्यक्रमाला राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त दत्तात्रय वारे गुरुजी, एबीपी माझा वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक राजीव खांडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. भाऊसाहेब जाधव अध्यक्षस्थानी असणार आहेत. उद्योजक गणेश जाधव, दिशा परिवाराचे संस्थापक राजाभाऊ चव्हाण आणि दैनिक प्रभातचे सरव्यवस्थापक रवीकुमार इंडी उपस्थित राहणार आहेत." पुण्यासारख्या ठिकाणी ग्रामीण भागातून विद्यार्थी उच्चशिक्षणासाठी येतात. मात्र उच्चशिक्षणाचा खर्च करु शकत नसल्याने त्यांचे शिक्षण अपुरे राहू नये, या उद्देशाने राजाभाऊ चव्हाण यांनी २० वर्षांपूर्वी दिशा परिवाराची स्थापना केली. आतापर्यंत संस्थेच्या माध्यमातून सहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली असून, यंदा २५० विद्यार्थ्यांना जवळपास ८ लाख रुपयांची शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, असेही शिंदे यांनी नमूद केले.

## विकासदृष्टीपासून प्रशासनापर्यंत; 'अजित पवार : विचारपर्व' प्रकाशित





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर आपल्या कार्यशैली, विकासदृष्टी, प्रशासन आणि लोकाभिमुख नेतृत्वाचा ठसा उमटविणारे दिवंगत अजित पवार यांच्या सार्वजनिक जीवनाचा वैचारिक व चिकित्सक वेध घेणारा 'अजित पवार : विचारपर्व' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. डॉ. नानासाहेब धोंडिबा पवार यांनी लिहिलेल्या या ग्रंथाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते बालगंधर्व रंगमंदिर येथे झाले. संस्कृती प्रकाशन, पुणे यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या ग्रंथाला प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांची प्रस्तावना लाभली आहे. तसेच सुनेत्रा अजित पवार आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव अॅड. संदीप कदम यांचे शुभेच्छा संदेश आहेत. 'विचारपर्व' हा केवळ राजकीय नेत्याच्या जीवनातील घटनांची नोंद करणारा चरित्रग्रंथ नसून, नेतृत्व, विकास, प्रशासन, शिक्षण, कृषी, सहकार, उद्योग, कला, क्रीडा, संस्कृती आणि सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंच्या माध्यमातून अजित पवार यांच्या कार्याचा वैचारिक अन्वयार्थ मांडण्याचा प्रयत्न आहे. लेखक डॉ. पवार हे बारामती तालुक्यातील काटेवाडी येथील रहिवासी असून, अजित पवार आणि शरदचंद्र पवार यांच्या सहकार्याचा आपल्या शैक्षणिक जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. एम.ए., एम.फिल., नेट व पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या संस्थेत मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून दोन दशके काम केले आहे. ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य आणि मित्रमंडळी उपस्थित होते.

## सुरक्षित समाजासाठी पोलिस, सुरक्षा यंत्रणा व तंत्रज्ञानाचा समन्वय आवश्यक : संजय दराडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"सुरक्षित आणि सक्षम कार्यस्थळे व समाज निर्माण करण्यासाठी पोलिस, सुरक्षा क्षेत्रातील व्यावसायिक, तंत्रज्ञान तज्ज्ञ, सरकारी यंत्रणा, विविध संस्था आणि नागरिकांमध्ये समन्वय आवश्यक आहे. तंत्रज्ञानासोबत मानवी बुद्धिमत्ता आणि लोककेंद्री दृष्टिकोनाची सांगड घातल्यास अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी सज्ज समाज निर्माण करता येईल," असे प्रतिपादन पुण्याचे सहपोलिस आयुक्त संजय दराडे यांनी केले. पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स (पीएसपी) आणि एएसआयएस इंटरनॅशनल, पुणे चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिक्युरिटी रेझिलिअन्स थ्रू कोलॅबोरेशन' या विषयावर आयोजित 'पीएसपी-एएसआयएस कनेक्ट कॉन्क्लेव्ह'मध्ये संजय दराडे बोलत होते. अमनोरा द फर्न हॉटेलमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी माजी कामगार आयुक्त डॉ. ओंकार शर्मा, पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्सचे संस्थापक मंगेश काटे व सुनील बीडलम यांच्यासह समिती सदस्य लॉयड्स दास, ज्योती मीना आणि शेखर मेहता उपस्थित होते. यावेळी गुन्हे शोध, तपास, प्रतिबंध आणि विशेष पोलिसिंगमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आठ पोलिस कर्मचाऱ्यांचा 'एक्सलन्स इन पोलिस सर्व्हिस अवॉर्ड्स २०२५-२६'ने गौरव करण्यात आला.




# राहुल गांधींचे नवे राजकारण : विचारांपेक्षा 'गोष्टीं'मधून जनसंवादाची नवी वाट

**(दै. आरंभ पर्व)**

**भारतीय राजकारणात भाषणं, घोषणा, आरोप-प्रत्यारोप आणि व्यक्तिकेंद्रित प्रचार यांना नेहमीच मोठे स्थान राहिले आहे. एखाद्या व्यक्तीला नायक किंवा खलनायक ठरवणे, एखाद्या पक्षाला अथवा संघटनेला शत्रूच्या भूमिकेत उभे करणे आणि त्याभोवती राजकीय वातावरण तयार करणे, हीदेखील राजकारणाची परिचित पद्धत आहे. मात्र राहुल गांधी यांच्या अलीकडील राजकीय कार्यक्रमांकडे बारकाईने पाहिले, तर त्यांच्या राजकारणात एका वेगळ्या पद्धतीची चाहूल लागते. ही पद्धत म्हणजे विचार सांगण्यापेक्षा लोकांच्या गोष्टी ऐकणे आणि त्या गोष्टींमधून समाजासमोरील प्रश्न मांडणे.**

पुण्यात झालेल्या 'छात्रों की गूँज' या कार्यक्रमात या नव्या राजकीय शैलीचे विशेष दर्शन घडले. या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू राहुल गांधी नव्हते, तर तरुण-तरुणींच्या आयुष्यातील अनुभव, त्यांच्या आकांक्षा आणि त्यांच्यासमोरील सामाजिक प्रश्न होते. विशेष म्हणजे या संवादात केवळ अभिजन वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग नव्हता; बहुजन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनाही व्यासपीठ मिळाले. त्यांच्या व्यक्तिगत अनुभवांच्या गोष्टी आणि राहुल गांधी यांचे धोरणविषयक भाष्य यांची सांगड घालण्यात आली.

यामध्येच या प्रयोगाचे वेगळेपण दडले आहे.

लोकांवर केवळ विचारांचा परिणाम होत नाही; अनेकदा गोष्टींचा परिणाम अधिक खोलवर होतो, हे राहुल गांधी यांनी अचूक ओळखल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले. एखाद्या धोरणाचा परिणाम काय होतो, हे आकडे सांगू शकतात; परंतु त्या धोरणामुळे एखाद्या तरुणाच्या आयुष्यात नेमका काय बदल झाला, हे त्याची गोष्ट अधिक प्रभावीपणे सांगू शकते. म्हणूनच तरुणांच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवून त्यातून बेरोजगारी, शिक्षण, संधी, सामाजिक विषमता, भविष्याच्या आकांक्षा अशा प्रश्नांकडे पाहण्याचा प्रयत्न या कार्यक्रमात झाला.

राहुल गांधी यांच्या या शैलीत आणखी एक महत्त्वाचा बदल दिसतो. त्यांनी नरेंद्र मोदी, अमित शहा, भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर थेट टीका करण्याला कार्यक्रमाचा केंद्रबिंदू बनवले नाही. नेहमीच्या राजकीय सभेप्रमाणे विरोधकांचे नामोल्लेख, आरोप आणि प्रत्यारोप यांना प्राधान्य दिले गेले नाही. त्याऐवजी तरुणांच्या कथा ऐकवून त्यातून




**मा. प्रतिक गंगणे - शाईचा प्रवास**

**मोबाईल : 7276314142**


समाजापुढे कोणते प्रश्न उभे आहेत आणि त्या प्रश्नांवर धोरणात्मक दिशा कोणती असायला हवी, यावर चर्चा करण्यात आली.

**राजकारणातील हा बदल लक्षणीय आहे :** गोष्ट सांगताना राहुल गांधी स्लाइड्सचा वापर करतात. त्यामध्ये छायाचित्रे, मजकूर आणि आकडेवारी असते. म्हणजेच भावनिक अनुभव आणि धोरणात्मक विश्लेषण यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न दिसतो. केवळ भावनिक भाषण किंवा केवळ कोरडी आकडेवारी याऐवजी अनुभव + माहिती + धोरण अशी संवादाची नवी चौकट तयार केली जात आहे.

यातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या दीर्घकाळच्या राजकीय संभाषिताला पर्यायी कथानक उभे करण्याचा प्रयत्नही दिसतो. हिंदू संस्कृतीचा गौरव, मुसलमान समाजाबद्दलचा संशय, शेजारी राष्ट्रांकडून असलेला धोका किंवा विशिष्ट समाजाच्या तुष्टीकरणाचे आरोप या पारंपरिक राजकीय मुद्द्यांऐवजी राहुल गांधी सामाजिक प्रश्न, तरुणांच्या आकांक्षा आणि नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवांना केंद्रस्थानी आणत आहेत.

ही बाब केवळ काँग्रेसच्या प्रचारशैलीतील बदल म्हणून पाहणे अपुरे ठरेल. कारण या प्रयोगाचा प्रेक्षकवर्गही वेगळा आहे.

नगरसेवक, आमदार, खासदार किंवा मंत्री होण्याची इच्छा असलेले राजकीय कार्यकर्ते हा या संवादाचा प्राथमिक केंद्रबिंदू नाही. त्याऐवजी तरुणांच्या आकांक्षा हेच राजकारणाचे केंद्र असावे, अशी भूमिका यातून पुढे येते. हे पारंपरिक राजकीय चौकटीला आव्हान देणारे आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात हा बदल अधिक मोठा प्रश्न उपस्थित करतो. राज्यातील अनेक जुन्या राजकीय घराण्यांनी सत्तेची विशिष्ट रचना निर्माण केली. आमदारकी, खासदारकी, मंत्रीपद यापासून स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आणि विविध सत्ताकेंद्रांपर्यंत राजकीय प्रभावाचे जाळे उभे राहिले. ही व्यवस्था केवळ एका पक्षापुरती मर्यादित नाही. काँग्रेसपासून राष्ट्रवादी काँग्रेसपर्यंत आणि इतर अनेक पक्षांमध्ये घराणेशाहीच्या राजकारणावर वेळोवेळी टीका झाली आहे.

राहुल गांधींचे सध्याचे राजकारण या सत्ताकेंद्रित व्यवस्थेपेक्षा वेगळा सामाजिक आधार शोधण्याचा प्रयत्न करत असेल, तर महाराष्ट्रातील पारंपरिक काँग्रेस नेतृत्वासाठी तो निश्चितच अस्वस्थ करणारा बदल ठरू शकतो. कारण हे राजकारण केवळ पदांच्या वाटपावर किंवा निवडणूक व्यवस्थापनावर आधारित नसून नव्या पिढीशी थेट संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

काँग्रेसच्या इतिहासाकडे पाहिले, तर पक्षाने वेगवेगळ्या काळात वेगवेगळे सामाजिक आधार निर्माण केले आहेत. महात्मा गांधींनी काँग्रेसला जनमानसाशी आणि ग्रामीण भारताशी जोडले. जवाहरलाल नेहरूंच्या काळात ग्रामीण नेतृत्वाला आणि शेतकरी समाजाला नवी राजकीय ऊर्जा मिळाली. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व त्याच प्रक्रियेतून बळकट झाले. इंदिरा गांधींच्या काळात पक्षाने दलित, अल्पसंख्याक आणि आदिवासी समाजाशी व्यापक संबंध निर्माण केला. राजीव गांधींच्या काळात व्यावसायिक आणि तंत्रज्ञानाभिमुख मध्यमवर्गाशी संवाद वाढवण्याचा प्रयत्न झाला.

आता राहुल गांधी वेगळ्या सामाजिक आधाराच्या शोधात आहेत, असे म्हणता येईल. हा आधार कोणत्या एका जातीचा, धर्माचा किंवा प्रदेशाचा नसून नव्या पिढीच्या आकांक्षांचा असू शकतो.

'छात्रों की गूँज' या कार्यक्रमातील आणखी एक बाब लक्षवेधी ठरते. सहभागी तरुण-तरुणी इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये संवाद साधत होते. त्यांच्या मातृभाषांचा अभिमान असणे स्वाभाविक आहे; मात्र देशव्यापी संवादासाठी हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. राहुल गांधींच्या संवादाची व्याप्ती केवळ एका प्रदेशापुरती किंवा एका भाषिक समूहापुरती मर्यादित न ठेवण्याचा हा प्रयत्न म्हणूनही त्याकडे पाहता येईल.

या सगळ्याचा अर्थ राहुल गांधी यशस्वी होतीलच, असा नाही. राजकारणात कोणताही प्रयोग यशस्वी होईल याची हमी नसते. भविष्य नेहमीच अनिश्चित असते. परंतु भविष्य केवळ भविष्यवाण्यांनी घडत नाही; आज घेतलेले निर्णय, आज केलेली कृती आणि आज निर्माण केलेले सामाजिक संबंध यांच्यातून भविष्याची दिशा निश्चित होत असते.

म्हणूनच राहुल गांधी यशस्वी होतील का, हा प्रश्न आजच्या घडीला कदाचित दुय्यम आहे. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की भारतीय राजकारणात ते नवा संवादप्रकार निर्माण करू शकतील का?

व्यक्तिपूजा, शत्रुनिर्मिती, आरोप-प्रत्यारोप आणि केवळ निवडणूक गणित यापलीकडे जाऊन जर तरुणांच्या वास्तविक अनुभवांना राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले गेले, तर हा भारतीय राजकारणातील महत्त्वाचा बदल ठरू शकतो.

या नव्या राजकारणाला पारंपरिक राजकीय चौकटीतून समजून घेणे कठीण आहे. कारण जुन्या राजकारणात विचारधारा केंद्रस्थानी होती आणि गोष्टी त्या विचारधारेच्या समर्थनासाठी वापरल्या जात. राहुल गांधींच्या नव्या प्रयोगात कदाचित उलट प्रक्रिया सुरू आहे—गोष्टी केंद्रस्थानी आहेत आणि त्या गोष्टींमधून विचार, धोरण आणि राजकीय दिशा शोधली जात आहे.

भारतीय राजकारणाला हा प्रयोग किती दूर घेऊन जाईल, हे काळच ठरवेल. मात्र एवढे नक्की की, राजकारणाच्या नेहमीच्या चौकटीबाहेर विचार करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

**आणि म्हणूनच राहुल गांधी यांच्या या नव्या राजकीय प्रयोगाला मनःपूर्वक शुभेच्छा!**

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



### उरुळी कांचन पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : उरुळी कांचन ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची 37 वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात नुकतीच पार पडली. सभासदांसाठी पंधरा टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. सभासदांच्या सुचनेचा आदर राखत ज्या काही योग्य सुचना आहेत त्यांचा विचार नक्कीच केला जाईल असे मत उरुळी कांचन पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष देविदास भन्साळी यांनी व्यक्त केले. उरुळी कांचन संस्थेचे मुख्य व्यवस्थापक हरिदास भन्साळी यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले. आर्थिक वर्षाचे ताळेबंद व लेखापरिक्षण अहवाल वाचण्यात आले. संस्थेला चालू आर्थिक वर्षात निवळ नफा 1,00,65,000 इतका झाला असून निव्वळ थकबाकी शून्य टक्के आहे. समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींसह सभासदांच्या मुलांचा दहावी व बारावीच्या शालांत परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ नेते प्रा के डी बापु कांचन, राजाराम कांचन, राजेंद्र टिळेकर, संतोष कांचन, सुरेश सातव, दत्तात्रय कांचन, योगिनी कांचन, बजरंग म्हस्के, बबनराव कांचन, नंदकुमार मुरकुटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या कामकाजबद्दल समाधान व्यक्त केले. संस्थेने सभासदांना 12 टक्के दराप्रमाणे कर्ज वाटप करण्यात येत असल्याचे जाहीर केले. याप्रसंगी माजी सरपंच ज्ञानोबा कांचन, आबासाहेब कांचन, अशोक सावंत, जयप्रकाश बेदरे, एकनाथ चौधरी, शिवाजी कांचन, आबासाहेब टिळेकर, कोंडीराम चौधरी, संभाजी कांचन, संगिता दरेकर, सुरेखा भन्साळी, अनिल दरेकर, मिनल फुलफगर, मेमाणे फार्मचे किशोर मेमाणे, राजेश फुलफगर, संतोष भन्साळी, नरेंद्र काटे, गिरीश ताम्हाणे, गणेश कांबळे, के.के.खिरीड, आदी सर्व संचालक मंडळ, खातेदार, सभासद, सल्लागार, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. संस्थेचे खजिनदार मिलिंद जगताप यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले.




### तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक व्हावे : उदय काळभोर

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : कदमवाकवस्ती येथील एम आयटी कॉर्नर येथे चार तरुणांनी एकत्र येत 'सात्विक थाळी' नावाने हॉटेल सुरू केले हॉटेलचे उद्घाटन कदमवाकवस्ती गावचे सुपुत्र पोलीस उपनिरीक्षक उदय काळभोर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले यावेळी त्यांनी चारही तरूणांना शुभेच्छा देत तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचे व्यवसाय सुरू करुन उद्योजक व्हावे असे आवाहन केले.यामध्ये लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथे रहिवासी असणारे अक्षय गिरमकर,विशाल दुंडे,विशाल निगडे आणि बलराम मोळवणे या तरुणांनी एकत्र येत या व्यवसायात पदार्पण केले आहे.तरुणांनी सुरू केलेल्या 'सात्विक थाळी' हॉटेलचे उद्घाटन उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाले. पारंपरिक महाराष्ट्रीयन चवीचा आस्वाद ग्राहकांना मिळावा, या उद्देशाने या हॉटेलची सुरुवात करण्यात आली आहे. तसेच या ठिकाणी मेसच्या माध्यमातून चांगले दर्जेदार जेवण देणारे असल्याचे या तरुणांनी सांगितले.त्यांच्या या उपक्रमाचे परीसरातुन कोतुक होत आहे. यावेळी परिसरातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तरुणांनी व्यवसाय क्षेत्रात पुढाकार घेत स्वतःचा व्यवसाय उभारल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. स्वच्छता, दर्जेदार पदार्थ, घरगुती चव आणि ग्राहकांना उत्तम सेवा देण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे हॉटेल व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. सात्विक व रुचकर भोजनामुळे हे हॉटेल ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांकडुन व्यक्त करण्यात आला.

# एसटी बस उपलब्ध करून देणाऱ्या अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

येथील राजगुरुनगर एसटी आगाराकडून १५ वर्षांपासून पंढरपूर मासिक वारीसाठी एसटी बस उपलब्ध करून देणाऱ्या अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान शिरुर तालुक्यातील थिटेवाडी, करंदी, वाजेवाडी, पाबळ, लोणी, मांजरेवाडी, खैरेनगर येथील वारकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

आषाढी आणि कार्तिकी एकादशीसह प्रत्येक महिन्याला पंढरपूरची नियमीत वारी करणाऱ्या थिटेवाडी (ता. शिरूर) व या परिसरातील वारकऱ्यांच्या मागणीनुसार राजगुरुनगर एसटी आगाराचे अधिकारी गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने विशेष बस सेवांचे नियोजन करत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय



आणि सेवाभावी कार्याचे कौतुक करण्यासाठी स्थानिक नागरिक आणि वारकरी संप्रदायाच्या वतीने हा सन्मान सोहळा आयोजित केला होता. कार्यक्रमासाठी आगारव्यवस्थापक श्रीमती विद्या कदम, सहाय्यक वाहतूक अधीक्षक तुकाराम पवळे, वाहतूक निरीक्षक प्रविण तुपसांगवे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, वरिष्ठ लिपिक स्नेहा कातोरे, आगार लेखाकार नेहा टाक, पुष्पा चासकर, आदर्श चालक कर्मचारी भगवान मोहीते, नितिन पवार, प्रशांत होले, अजिंक्य फलके उपस्थित होते. यावेळी बोलताना ह.भ.प. सुखदेव महाराज गुलाब थिटे म्हणाले, थिटेवाडी आणि परिसरातील भाविकांना मासिक वारीसाठी पंढरपूर विठ्ठल दर्शनासाठी जाता यावे, म्हणून राजगुरुनगर आगार नेहमीच तत्पर राहिले आहे. कोणतीही अडचण येऊ न देता, दर महिन्याला वेळेवर आणि पुरेशा बसेस सोडण्याचे मोठे आव्हान हे अधिकारी लीलया पेलत आहेत. सलग १५ वर्षे ही सेवा अविरतपणे सुरू ठेवल्याबद्दल प्रशासकीय अधिकाऱ्यांचा वारकऱ्यांच्या वतीने हा कौतुक सोहळा होत आहे.

भक्तीमय वातावरणात झालेल्या या सन्मान सत्कार सोहळ्यादरम्यान विठूनामाचा गजर सुरू होता. उपस्थित वारकऱ्यांनी अधिकाऱ्यांचे आभार मानताना अत्यंत भावुक भावना व्यक्त केल्या.

याप्रसंगी ह.भ.प. वसंत राजाराम खैरे , विलास मुरलीधर थिटे, विश्वास शांताराम चौधरी पाटील, वारकरी मंडळांचे पदाधिकारी यांनी अधिकारी व कर्मचारी यांना शाल, श्रीफळ आणि विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना राजगुरुनगर आगाराच्या आगारव्यवस्थापक श्रीमती विद्या कदम म्हणाल्या, "वारकऱ्यांना पंढरपूरला सुखरूप पोहोचवणे ही केवळ आमची ड्युटी नसून, ती विठ्ठलाचीच सेवा आहे असे आम्ही मानतो. प्रवाशांना उत्तम सुविधा देण्यासाठी आमचे सर्व कर्मचारी अहोरात्र कष्ट घेतात. या सन्मानामुळे आमची जबाबदारी आणखी वाढली आहे," असे त्यांनी सांगितले.या यशस्वी नियोजनामुळे राजगुरुनगर आगाराचे नाव संपूर्ण पुणे विभागात अभिमानाने घेतले जात आहे. कार्यक्रमासाठी आगारातील चालक, वाहक आणि यांत्रिक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### अविरत सेवेप्रति कृतज्ञता

पंधरा वर्षांपुर्वी ही सेवा सुरू केल्यानंतर मध्ये काही काळ सहाय्यक वाहतूक अधीक्षक तुकाराम पवळे यांची बदली झाली होती. तरीची बदलीच्या ठिकाणी गेल्यानंतरही येथील वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून, स्थानिक प्रशासनाला विनंती करून त्यांनी राजगुरूनगर आगारातून ही सेवा कायम ठेवली. दरम्यानच्या काळात सांगली विभागातून राजगुरुनगर आगारात वरीष्ठ आगारव्यवस्थापक पदावर श्रीमती विद्या कदम यांनी पदभार स्विकारला. परंतु त्यांनीही वारकऱ्यांच्या मागणीला प्रतिसाद देत हि सेवा अविरत सुरू ठेवली. असे सांगून वारकऱ्यांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

## १२ तासांत ३५२ ॲनोरेक्टल तपासण्या करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हीलिंग हँड्स फाऊंडेशन या कोलोरेक्टल आरोग्यसेवेतील आघाडीच्या संस्थेची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सकडून अधिकृत नोंद घेण्यात आली आहे. फाऊंडेशनने वर्ल्ड पाईल्स डे (२० नोव्हेंबर २०२५) निमित्त आयोजित एका विशेष समुदाय आरोग्य उपक्रमादरम्यान १२ तासांच्या आत सर्वाधिक व्यक्तींनी ॲनोरेक्टल (गुदद्वाराशी संबंधित) तपासणीसाठी नोंदणी करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. या १२ तासांच्या तपासणी मोहिमेत ३५२ पात्र सहभागींची ॲनोरेक्टल तपासणी करण्यात आली, ज्यामुळे फाऊंडेशनला हा प्रतिष्ठित जागतिक विक्रम मिळाला. महाराष्ट्रातील पुणे येथे आयोजित या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर मोफत ॲनोरेक्टल



तपासणी मोहिमेसह व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. मूळव्याध (पाईल्स), गुदभेग (फिशर) आणि भगंदर (फिस्तुला) यांसारख्या आजारांवर वेळेवर उपचार घेण्यासाठी व्यक्तींना प्रोत्साहित करणे हा यामागचा उद्देश होता. संकोच, जनजागृतीचा अभाव आणि उशिरा होणारे निदान यामुळे हे आजार बहुधा उपचारांशिवाय राहतात.

## येरवड्यातील जबरी चोरीचा छडा; सराईत गुन्हेगारांना बेड्या

वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ८७ सीसीटीव्हींची तपासणी; ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कल्याणीनगर येथील ट्रम्प टॉवरसमोर एका व्यक्तीला जीवे मारण्याची धमकी देत त्याच्याकडील रोख रक्कम जबरदस्तीने लुटणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना येरवडा पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने घटनास्थळासह परिसरातील तब्बल ८७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. या कारवाईत आरोपींकडून फिर्यादीच्या नावाचे आधारकार्ड, १० हजार रुपये रोख आणि सुमारे ५० हजार रुपये किमतीची दुचाकी असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी येरवडा पोलीस ठाण्यात या



प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी हे ट्रम्प टॉवर, कल्याणीनगरसमोर फोनवर बोलत उभे असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडविले. 'रागाने का पाहतोस?' असे म्हणत आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यांच्या खिशातील सुमारे १५ हजार १०० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर दोन्ही आरोपी दुचाकीवरून पसार झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांकडून आरोपींना तातडीने जेरबंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पोलीस उपायुक्त चिलुमूला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर यांनीही तपास पथकाला आवश्यक सूचना दिल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार साईनाथ म्हस्के आणि अनिल मन्हाळकर यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. घटनास्थळ आणि परिसरातील तब्बल ८७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. आरोपींच्या हालचाली, दुचाकी आणि त्यांच्या मार्गाचा मागोवा घेण्यात आला. त्याचबरोबर तांत्रिक विश्लेषणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी हे हडपसर परिसरात राहत असल्याचे समोर आले. दोघेही हडपसर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेऊन हडपसर पोलिसांच्या मदतीने दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे निखील ऊर्फ दाद्या शशिकांत कांबळे (वय २६, रा. वेताळबाबा वसाहत, गाडीतळ, हडपसर) आणि अयान नासीर शेख (वय २२, रा. गल्ली क्रमांक १९, सय्यदनगर, हडपसर) अशी आहेत.



## थोडक्यात पण महत्वाचे



## ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाची पुण्याला भेट

पुणे (आरंभ पर्व) : ऑस्ट्रेलियन विद्यापीठे, उच्चशिक्षण संस्था आणि शालेय मंडळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २२ सदस्यीय ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाने 'ऑस्ट्रेड हायर एज्युकेशन वीक २०२६'चा भाग म्हणून १६ आणि १७ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्याला भेट दिली. ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील विद्यार्थी देवाणघेवाण वाढवणे आणि शैक्षणिक संबंध अधिक दृढ करणे, हा या भेटीचा प्रमुख उद्देश होता. ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाच्या या भेटीचे नेतृत्व ऑस्ट्रेलिया सरकारच्या 'ऑस्ट्रेलियन ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशन'ने केले. या उपक्रमाला पश्चिम ऑस्ट्रेलिया सरकारच्या 'इन्व्हेस्ट अँड ट्रेड वेस्टर्न ऑस्ट्रेलिया'चे सहकार्य लाभले. पुण्यात शिष्टमंडळाने विद्यापीठे आणि शाळांशी संवाद साधला. भारतीय विद्यार्थ्यांच्या बदलत्या अपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे, शैक्षणिक सहकार्य आणि विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक मार्गांच्या संधींचा शोध घेणे; तसेच ऑस्ट्रेलियन आणि भारतीय शैक्षणिक संस्थांमधील संबंध अधिक मजबूत करणे, यावर या संवादात भर देण्यात आला. उच्च शिक्षण, कौशल्य विकास, संशोधन आणि नवोन्मेष या क्षेत्रांतील विद्यार्थी देवाणघेवाण, संस्थात्मक सहभाग आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील शैक्षणिक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी ही भेट महत्त्वाची ठरणार आहे.

## नॅचरल्स एनएक्सटी कडून एआय पॉवर्ड ब्यूटी एक्सपिरियन्स सादर



पुणे (आरंभ पर्व) : भारतातील सलूनच्या सर्वांत मोठ्या शृंखलांपैकी एक असलेल्या नॅचरल्सच्या नॅचरल्स एनएक्सटी या एआय तंत्रज्ञानावर आधारित सलून संकल्पनेचे अनावरण पुणे येथील अमनोरा मॉल येथे करण्यात आले..यासोबतच कंपनी तिच्या २५ वर्षांच्या प्रवासातील एक महत्त्वाचा नवीन अध्याय सुरू करत आहे. १,००० सलूनचा टप्पा गाठल्याचा आनंद साजरा करत असतानाच हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यातून दक्षिण भारतातून विस्तारलेल्या एका ब्युटी ब्रँडची खऱ्या अर्थाने 'राष्ट्रीय स्तरावरील ब्रँड' म्हणून विकसित होण्याची आणि अल्पावधीतच ४,५०० हून अधिक सलूनपर्यंत पोहोचण्याची महत्त्वाकांक्षा दिसून येते. नॅचरल्स एनएक्सटी सलून चे उद्घाटन नॅचरल्स सलूनचे सहसंस्थापक सीकेके यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी संजीव धिमान, सीईओ, नॅचरल्स, संध्या, अमनोरा मॉल आणि गुंजन सीओओ, नॅचरल्स यांच्या सह अन्य मान्यवर हि उपस्थित होते.

### समाविष्ट गावांच्या समस्यांना मिळणार

# 'जागेवरच' समाधान

- प्रभाग ३४ मध्ये 'नगरसेवक आपल्या दारी'

### नगरसेवक हरिदास चरवड यांची अनोखी संकल्पना



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाविष्ट गावांचा समावेश असलेल्या प्रभाग क्रमांक ३४ मध्ये नागरिकांच्या नागरी समस्या थेट त्यांच्या दारी जाऊन जाणून घेण्यासाठी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या संकल्पनेतून 'नगरसेवक आपल्या दारी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. २६ ऑगस्टपासून या उपक्रमाला सुरुवात होणार असून, नगरसेवकांसह संबंधित प्रशासकीय अधिकारीही नागरिकांच्या भेटीला येणार आहेत.

प्रभाग क्रमांक ३४ मध्ये समाविष्ट गावांची संख्या आणि विस्तार मोठा असल्याने अनेक भागांमध्ये मूलभूत नागरी सुविधांशी संबंधित प्रश्न आजही नागरिकांसमोर आहेत. ड्रेनेज, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे यांसह विविध नागरी सुविधांबाबत नागरिकांना सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकदा समस्या सोडविण्यासाठी नागरिकांना महापालिका कार्यालयात जाऊन पाठपुरावा करावा लागतो.

नागरिकांच्या या अडचणी लक्षात घेऊन समस्या केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन त्यांची पाहणी करून तोडगा काढण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे. संबंधित प्रशासकीय अधिकारीही सोबत असल्याने नागरिकांनी मांडलेल्या समस्यांवर तातडीने निर्णय घेणे किंवा संबंधित विभागाला आवश्यक सूचना देणे शक्य होणार आहे.

या उपक्रमामुळे नागरिक, नगरसेवक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद निर्माण होणार असून, प्रभागातील प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. विशेषतः समाविष्ट गावांमध्ये मूलभूत सुविधांचा विस्तार आणि उपलब्ध सुविधांमधील त्रुटी दूर करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

"प्रभाग ३४ हा समाविष्ट गावांचा प्रभाग असल्याने नागरिकांच्या समस्या आणि मूलभूत सुविधांच्या गरजा मोठ्या आहेत. नागरिकांना आपल्या प्रश्नांसाठी वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी आम्ही थेट त्यांच्या दारी जाण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत समस्यांची पाहणी करून शक्य ते प्रश्न जागेवरच सोडविण्यावर आमचा भर राहणार आहे," अशी भूमिका नगरसेवक हरिदास चरवड यांनी व्यक्त केली.

२६ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या 'नगरसेवक आपल्या दारी' उपक्रमामुळे प्रभागातील नागरिकांच्या समस्यांना प्रत्यक्ष भेटीतून आणि प्रशासनाच्या समन्वयातून समाधान मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

## विशेष परिसंवाद : सीजेपी आंदोलनात अर्बन नक्षलवाद !




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीची मूळ संकल्पना हिंदु धर्मानेच जगाला दिली आहे. भारत हा मुक्त विचारांचा देश असतांनाही, डावी विचारधारा देशाच्या प्रगतीत सातत्याने अडथळे आणत आहे. 'अवॉर्ड वापसी गँग', 'नर्मदा बचाव आंदोलन' आणि 'शेतकरी आंदोलनां'च्या आडून न्यायव्यवस्था, सैन्य, प्रसारमाध्यमे आणि शिक्षण व्यवस्था या लोकशाहीच्या मुख्य स्तंभांवर जाणीवपूर्वक आक्रमणे केली जात आहेत. हे धोकादायक षड्यंत्र उधळून लावण्यासाठी युवा पिढीला खऱ्या इतिहासाची जाणीव करून देणे आणि वैचारिक पातळीवर सक्षम करणे गरजेचे आहे. यापुढील काळात केवळ सरकारवर अवलंबून न राहता देव, देश आणि धर्म रक्षणासाठी तरुणांनी आपले योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता सत्येंद्र मुळे यांनी केले. सनातन संस्थेच्या वतीने २० ऑगस्ट रोजी पुणे येथील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयातील गणेश सभागृहात 'सीजेपी आंदोलनात अर्बन नक्षलवाद?' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी ३०० हून अधिक लोक उपस्थित होते. कार्यक्रमात सामाजिक व राजकीय विश्लेषक श्री. सर्वेश मेहंदळे यांनी वक्त्यांशी संवाद साधत अर्बन नक्षलवादाची विविध अंगे उलगडून दाखवली. याप्रसंगी बोलताना सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले, "पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी 'दिमागी नक्षलवादापासून सावध राहा' असा इशारा देऊन देशाला अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला आहे. साम्यवाद आणि अर्बन नक्षलवाद हा भारतीयत्वाला झालेला मानसिक कर्करोग आहे. हा आजार दूर करण्यासाठी वैचारिक व बौद्धिक पातळीवर शस्त्रकर्म करावे लागेल. 'जेन-झी' पिढीसमोर साम्यवाद्यांचा खरा चेहरा आणून दाखवणे आणि समाजवाद्यांचा दुटप्पीपणा उघड करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे."

## iQOO Z11 5G लॉँच; AI-सक्षम उत्पादकता आणि 50 तासांच्या बॅटरीसह iQOO Budsही बाजारात

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

उच्च कार्यक्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या iQOO या स्मार्टफोन ब्रँडने भारतात iQOO Z11 5G स्मार्टफोन लॉँच केला आहे. भारतातील पहिल्या MediaTek Dimensity 7500 Turbo प्रोसेसरसह सादर करण्यात आलेला हा स्मार्टफोन विशेषतः विद्यार्थ्यांची उत्पादकता, मनोरंजन आणि दैनंदिन वापर लक्षात घेऊन विकसित करण्यात आला आहे. कंपनीने याचवेळी ५० तासांपर्यंत बॅटरी क्षमता असलेले iQOO Buds देखील सादर केले आहेत. iQOO Z11 5G मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अनेक उत्पादकता वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. थेट व्याख्यानांचा सारांश तयार करणे, ध्वनिमुद्रणाचे लिखित रूपांतर करणे, भाषांतर, मोठ्या दस्तऐवजांचा आढावा घेणे, असाइनमेंट सुधारणा, कल्पनांची मांडणी आणि आशय निर्मिती यांसारखी कामे अधिक सोपी करण्याचा कंपनीचा दावा आहे.

iQOO Z11 5G ची सुरुवातीची किंमत ६ जीबी + १२८ जीबी प्रकारासाठी ३४,९९९ रुपये आहे.




या प्रकाराची निव्वळ प्रभावी किंमत ३१,४९९ रुपये आहे. ८ जीबी + १२८ जीबी प्रकाराची किंमत ३९,९९९ रुपये असून निव्वळ प्रभावी किंमत ३५,९९९ रुपये आहे. ८ जीबी + २५६ जीबी प्रकाराची किंमत ४४,९९९ रुपये असून निव्वळ प्रभावी किंमत ४०,९९९ रुपये आहे. तर १२ जीबी + २५६ जीबी प्रकाराची किंमत ४९,९९९ रुपये असून निव्वळ प्रभावी किंमत ४५,९९९ रुपये आहे. हा स्मार्टफोन सेलेस्टियल ब्लू आणि ऑरोरा ग्रीन या दोन रंगांमध्ये उपलब्ध होणार आहे. २५ ऑगस्ट २०२६ पासून iQOO ई-स्टोअर, Amazon.in, Vivo एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, रिलायन्स डिजिटल आणि निवडक किरकोळ विक्री केंद्रांवर विक्री सुरू होणार आहे. iQOO Z11 5G मध्ये ६.८३ इंचांचा १.५के १४४ हर्ट्झ AMOLED कर्व्हड डिस्प्ले देण्यात आला आहे. या डिस्प्लेची कमाल चमक २००० निट्सपर्यंत आहे. त्यामुळे बाहेरील तेजस्वी प्रकाशातही स्क्रीनवरील मजकूर आणि दृश्ये स्पष्ट दिसण्यास मदत होते. दीर्घकाळ स्मार्टफोन वापरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कंपनीने फ्लॅगशिप-ग्रेड आय कम्फर्ट सुविधाही दिली आहे. ऑनलाइन वर्ग, वाचन, व्हिडिओ पाहणे आणि अभ्यासासाठी संशोधन करताना डोळ्यांवरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने हे वैशिष्ट्य देण्यात आले आहे.

# कळी उमलायच्या आधीच खुडली जातीये?

### एका चिमुकलीच्या दुर्दैवी अंताने पुन्हा एकदा समाजाच्या संवेदनशीलतेवर, सुरक्षिततेवर आणि व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**(दै. आरंभ पर्व)**

**कळी उमलायच्या आधीच खुडली जातेय... हा प्रश्न केवळ एका चिमुकलीच्या मृत्यूचा नाही. हा प्रश्न आहे त्या प्रत्येक बालिकेच्या सुरक्षिततेचा, जिच्या डोळ्यांत अजून भविष्याची स्वप्ने उमलायची आहेत. हा प्रश्न आहे त्या प्रत्येक आई-वडिलांच्या भीतीचा, जे आपल्या लेकराला सुरक्षित ठेवण्यासाठी दिवसभर कष्ट करतात आणि संध्याकाळी घरी परतताना 'माझं मूल सुखरूप असेल ना?' या एका विचाराने अस्वस्थ होतात.**

जुन्नर तालुक्यातील एका गावात घडलेल्या दहा वर्षांच्या चिमुकलीच्या अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक मृत्यूने समाजमन हादरले आहे. उपलब्ध वृत्तांतानुसार, प्रकृती ठीक नसल्याने ही मुलगी त्या दिवशी शाळेत गेली नव्हती. आई-वडील रोजंदारीच्या कामासाठी घराबाहेर गेले होते. दुपारच्या सुमारास तिच्या



ओळखीचा एक तरुण तिला पेरूच्या बागेत नेण्याचे आमिष दाखवून सोबत घेऊन गेला. त्यानंतर ती घरी परतली नाही. शोधाशोध, तक्रार आणि पोलिसांचा तपास सुरू झाल्यानंतर तिचा मृतदेह उसाच्या शेतात आढळला.

या घटनेतील तपशील जितके समोर येतात, तितका संताप वाढतो आणि त्याहून अधिक अस्वस्थ करणारा प्रश्न समोर उभा राहतो आपल्या समाजात मुलींना नेमके किती सुरक्षित ठेवता येते?

**बालपण हरवत चालले आहे का?**

बालपण म्हणजे निरागसता. शाळा, मित्रमैत्रिणी, खेळ, गोष्टी, स्वप्ने आणि उद्याची उत्सुकता. मात्र एखाद्या चिमुकलीच्या आयुष्यातील ही निरागस वर्षेच जर हिंसेच्या सावटाखाली संपत असतील, तर आपण विकासाची, आधुनिकतेची आणि प्रगतीची कितीही भाषा केली तरी आपल्या समाजाच्या विवेकबुद्धीसमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते.

या घटनेत विशेष वेदनादायक बाब म्हणजे आरोपी हा मुलीच्या परिचयातील असल्याचे तपासातून समोर आल्याचे वृत्तांतात नमूद आहे. त्याने तिला पेरूच्या बागेत नेण्याचे आमिष दाखवले आणि ती त्याच्यासोबत गेली.

मुलांना अनोळखी व्यक्तींपासून सावध राहण्याचे धडे देणे आवश्यक आहेच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे ओळखीच्या व्यक्तींपासूनही धोका असू शकतो, ही जाणीव पालक, शिक्षक आणि समाजाने मुलांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचवणे गरजेचे आहे.

### मा. प्रतिक गंगणे - शाईचा प्रवास

**मोबाईल : 7276314142**



**'ओळखीचा' चेहरा नेहमी सुरक्षित असतोच असे नाही**

आपल्या ग्रामीण समाजरचनेत प्रत्येकजण एकमेकांना ओळखतो. शेजारी, नातेवाईक, परिचित, गावातील व्यक्ती या नात्यांमुळे विश्वासाचे वातावरण तयार होते. हा विश्वासच समाजाची ताकद आहे. पण जेव्हा एखादा विकृत मनोवृत्तीचा व्यक्ती या विश्वासाचा गैरफायदा घेतो, तेव्हा धोका अधिक गंभीर बनतो.

म्हणूनच मुलांना केवळ 'अनोळखी व्यक्तीबरोबर जाऊ नको' एवढे सांगून चालणार नाही. कोणीही व्यक्ती चुकीच्या पद्धतीने स्पर्श करत असेल, एकांतात बोलावत असेल, गुपित ठेवण्यास सांगत असेल किंवा आमिष दाखवत असेल, तर तात्काळ विश्वासू मोठ्या व्यक्तीला सांगावे, हे मुलांना वयाला अनुरूप भाषेत शिकवणे आवश्यक आहे.

**या प्रकरणात पोलिस तपासाची महत्त्वाची भूमिका**

मुलगी बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. गावातील तसेच परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यात आले. एका सीसीटीव्हीमध्ये संबंधित तरुण मुलीला सायकलवरून घेऊन जात असल्याचे दिसून आले. चौकशीनंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि त्याच्या माहितीनुसार उसाच्या शेतातून मुलीचा मृतदेह आढळल्याचे वृत्तांतात नमूद आहे.

या तपासातून एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो तंत्रज्ञान आणि पारंपरिक पोलिस तपास यांचा योग्य वापर जीवघेण्या गुन्ह्यांची उकल करण्यात निर्णायक ठरू शकतो.

सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती, घटनास्थळावरील पुरावे आणि वैज्ञानिक तपास या सर्वांचा काटेकोरपणे वापर होणे आवश्यक आहे. उपलब्ध वृत्तांतातही या प्रकरणातील सीसीटीव्ही फुटेज आणि संबंधित व्यक्तींनी दिलेली माहिती तपासासाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे नमूद आहे.

**पण प्रश्न केवळ आरोपी सापडण्याचा नाही...**

आरोपी सापडला, तपास झाला, आरोपपत्र दाखल झाले आणि न्यायालयात खटला चालला यापलीकडेही या घटनेकडे पाहावे लागेल.

कारण प्रत्येक गुन्ह्यानंतर आपण आरोपीला दोषी ठरवून मोकळे होतो. पण हा गुन्हा घडण्यापूर्वी समाज म्हणून आपण काय केले होते?

एखाद्या व्यक्तीच्या वर्तनातून त्याची विकृत प्रवृत्ती यापूर्वीच जाणवत होती का? परिसरातील महिलांना किंवा मुलींना त्याच्यामुळे असुरक्षित वाटत होते का? कुणी तक्रार केली होती का? मुलांच्या सुरक्षिततेसाठी गावपातळीवर यंत्रणा सक्रिय होती का?

उपलब्ध वृत्तांतात संबंधित व्यक्तीच्या पूर्वीच्या संशयास्पद वर्तनाबाबत काही महिलांनी माहिती दिल्याचे नमूद आहे.

जर एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल समाजात आधीपासून संशय निर्माण झाला असेल, तर त्या संकेतांकडे दुर्लक्ष करणे हीदेखील गंभीर सामाजिक समस्या आहे.

**गरीब कुटुंबांची मुले अधिक असुरक्षित?**

या घटनेतील कुटुंब रोजंदारीवर काम करणारे असल्याचे वृत्तांतात नमूद आहे. आई-वडील पोटासाठी घराबाहेर असताना मुलगी घरी एकटी होती.

इथे आणखी एक कटू वास्तव समोर येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील पालकांना मुलांच्या सुरक्षेसाठी कायम त्यांच्या सोबत राहणे शक्य नसते. त्यांना काम करावेच लागते. रोजचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी आई-वडील घराबाहेर पडतात.

मग प्रश्न असा आहे की, कामाला गेलेल्या आई-वडिलांच्या मुलांच्या सुरक्षेची सामूहिक जबाबदारी कोणाची?

शाळा, ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि समाज या सर्वांनी मिळून बालसुरक्षेचे मजबूत जाळे उभे करण्याची गरज आहे.

**मुलांना 'गप्प बसू नका' हे शिकवण्याची वेळ**

बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये अनेकदा मुलांना भीती दाखवली जाते, आमिष दिले जाते किंवा 'हे कुणाला सांगू नको' असे सांगितले जाते.

त्यामुळे मुलांना एक गोष्ट अगदी स्पष्टपणे सांगण्याची गरज आहे तुमच्या शरीरावर, मनावर किंवा सुरक्षिततेवर कुणीही चुकीचा अधिकार गाजवू शकत नाही. कोणीतरी चुकीचा स्पर्श केला, एकांतात नेण्याचा प्रयत्न केला किंवा अस्वस्थ करणारे वर्तन केले तर ते सांगणे चुकीचे नाही. उलट, सांगणे हीच धैर्याची गोष्ट आहे. पालकांनीही मुलांनी एखादी गंभीर गोष्ट सांगितल्यावर त्यांना दोष देऊ नये. 'तू तिथे गेलीसच का?', 'त्याच्यासोबत का गेलीस?' असे प्रश्न विचारण्याऐवजी प्रथम मुलाचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि त्याच्या सुरक्षिततेची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

**समाजाने केवळ संताप व्यक्त करून थांबू नये**

घटना घडली की सामाजिक माध्यमांवर संतापाची लाट उसळते. आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी होते. ती मागणी स्वाभाविक आहे.

परंतु दोन दिवसांनी हा संताप ओसरतो.

*आणि मग पुढची घटना घडते.*

*ही साखळी कुठेतरी*

*थांबवावी लागेल.*

कायदा कठोर असणे आवश्यक आहेच; पण समाजाची जागरूकता त्याहून महत्त्वाची आहे.

गावात बालसुरक्षा समित्या प्रभावीपणे कार्यरत असणे, शाळांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, पालकांना जागरूक करणे, संशयास्पद वर्तनाकडे दुर्लक्ष न करणे आणि मुलांच्या तक्रारी गांभीर्याने ऐकणे या उपाययोजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरल्या पाहिजेत.

**पोलिसांचे चांगले काम कौतुकास्पद; पण तपासाला न्याय मिळणे तितकेच महत्त्वाचे**

या प्रकरणात उपलब्ध वृत्तांतानुसार सीसीटीव्हीच्या आधारे तपास पुढे नेण्यात आला आणि संशयित व्यक्तीपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले. पुणे ग्रामीण पोलिसांच्या इतर काही प्रकरणांतील जलद तपासाचाही संदर्भ वृत्तांतात देण्यात आला आहे.

तपास यंत्रणेने केलेले चांगले काम निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र कोणत्याही गंभीर गुन्ह्याच्या तपासात पुरावे मजबूत करणे, आरोपपत्र वेळेत दाखल करणे, पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सक्षमपणे पुढे नेणे आणि न्यायालयीन प्रक्रियेला आवश्यक सहकार्य करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण आरोपीला पकडणे हा न्यायाचा पहिला टप्पा आहे; अंतिम उद्दिष्ट म्हणजे पीडितेला न्याय मिळणे.

### 'कळी' खुडली जाऊ नये यासाठी...

एका चिमुकलीचे आयुष्य संपले. तिच्या आई-वडिलांच्या आयुष्यात मात्र हा आघात कायमचा राहणार आहे. ज्या घरात तिच्या हसण्याचा आवाज असायचा, तिथे आता शांतता असेल. ज्या हातांनी तिला शाळेची तयारी करून दिली, ते हात आता तिच्या आठवणींना कवटाळत असतील. ही केवळ एका घराची शोकांतिका नाही. ही संपूर्ण समाजाच्या अंतरात्म्याला हादरवणारी घटना आहे. कळी उमलण्याआधीच खुडली जाऊ नये, यासाठी प्रत्येकाने आपली भूमिका ठरवली पाहिजे. मुलांचे संरक्षण ही केवळ आई-वडिलांची जबाबदारी नाही. ती शाळेची, गावाची, प्रशासनाची, पोलिसांची आणि अखेर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या मुलांना भीतीच्या सावलीत नव्हे, तर सुरक्षित वातावरणात वाढण्याचा अधिकार आहे.

*त्यांच्या हातात खेळणी असावीत, भीती नाही.*

*त्यांच्या डोळ्यांत स्वप्ने असावीत, अश्रू नाहीत.*

*त्यांच्या ओठांवर हसू असावे, आक्रोश नाही.*

आणि त्यांच्या आयुष्याची कळी उमलण्याआधी कुणाच्याही विकृत मानसिकतेने ती खुडली जाऊ नये, यासाठी समाजाने आता केवळ संवेदना व्यक्त न करता जागे होण्याची वेळ आली आहे. कारण प्रत्येक चिमुकलीचे बालपण सुरक्षित असेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपला समाज सुरक्षित म्हणता येईल.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.